ePaper

**ट्रम्पच्या टॅरिफला भारत पायाखाली तुडवणार, रेडी केला 25 हजार कोटींचा प्लॅन**



वर्ष - 9 । अंक -10 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज™

www.mahaenews.com । सोमवार, दि. 25 ऑगस्ट 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## आतील पानांत


- हेड-मार्शची विक्रमी भागीदारी!
- मलानने मोडला रैनाचा मोठा विक्रम!
- शांततेच्या चर्चेत युरोपीय देशांचा खोडा!
- राहुल गांधींच्या सुरक्षेत मोठी चूक


### विधानसभा-लोकसभेत महायुती; स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये

# राष्ट्रवादी-शिवसेना स्वबळावर!

### पुणे, पिंपरी-चिंचवडमधील सर्वच्या सर्व जागांवर चाचपणी

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणूक ‘महायुती’ म्हणून लढलेले सत्ताधारी भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक स्वबळावर लढण्यासाठी तयारी करीत आहेत. स्वबळावर निवडणूक लढली, तरी महापौर आणि महत्त्वाची पदे ही ‘महायुती’ म्हणून देण्यात येतील. “त्यामागे पक्ष संघटन वाढवणे आणि इच्छुकांना न्याय देणे” असे सूत्र आहे, अशी माहिती महायुतीमधील एका बड्या नेत्यांने “महाईन्यूज”शी खासगीत बोलताना दिली.**



शिवसेना
महायुती

महायुतीमध्ये स्थानिक पातळीवर लढताना नेत्यांना अनेक अडचणी आहेत. 2017 मध्ये झालेली निवडणूक पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये प्रामुख्याने भाजपा विरुद्ध राष्ट्रवादी अशी झाली होती. त्यामुळे स्थानिक पातळीवर महायुतीच्या घटक पक्षांमध्ये अंतर्गत कुरबुरी, वर्चस्वाची लढाई सुरू असते. याउलट, महायुतीमध्ये “जी जागा ज्या पक्षाने जिंकली, ती त्या पक्षासाठी” या फॉर्म्युल्यानुसार, 2017 मध्ये पराभूत झालेल्या उमेवाराला आता महायुतीमध्ये संधी मिळणार नाही. असा उमेदवार तिकीट न मिळाल्यास महाविकास आघाडीत प्रवेश करणार आणि निवडणूक लढवणार हे निश्चित आहे. त्यामुळे संभाव्य बंडखोरी टाळण्यासाठी निवडणूक स्वबळावर लढायची... सर्व इच्छुकांना न्याय द्यायचा आणि निवडणुकीनंतर महायुती म्हणून सत्तेत सहभागी व्हायचे, असे महायुतीच्या पक्षश्रेष्ठींचे ठरले आहे. राष्ट्रवादीला भाजपाकडून दगाफटकाची भिती... पुणे आणि पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपाची ताकद तुल्यबळ आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांना दोन्ही शहरात किंबहुना पुणे जिल्ह्यात आपले वर्चस्व कायम ठेवायचे आहे. जुलै- 2024 मध्ये पुण्यात झालेल्या पक्षाच्या मेळाव्यातच अजित पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्था स्वबळावर लढण्याचे संकेत दिले होते. पिंपरी-चिंचवडमध्ये स्वबळावर निवडणूक व्हावी. कारण, शहरात भाजपाचे स्थानिक नेते आम्हाला सहकार्य करणार नाहीत, असा सूर स्थानिक नेत्यांनी धरला आहे. महायुतीमध्ये लढल्यास भाजपाकडून राष्ट्रवादीसोबत दगफटका होवू शकतो, अशी तक्रारही अजित पवार यांच्याकडे केली जात आहे.

**ठाणे, नाशिकमध्ये शिंदे गट स्वबळावर...**

दुसरीकडे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना गटाने ठाणे आणि नाशिकमध्ये स्वबळावर निवडणूक लढण्याचा निर्णय घेतल्याचे सांगितले जाते. ठाणे हे शिंदे गटाचे बालेकिल्ला मानले जात असून, येथे पक्षाची संघटनात्मक ताकदही लक्षणीय आहे. त्यामुळे येथे युतीच्या सहकार्याची गरज भासणार नाही, हा संदेश त्यांनी अप्रत्यक्षपणे दिला आहे. नाशिकमध्येही शिवसेनेचा स्थानिक प्रभाव असल्यामुळे स्वबळासाठी स्थानिक नेते मागणी

## ...तर महाविकास आघाडीसाठी पोषक स्थिती

भाजपा+शिवसेना+ राष्ट्रवादी महापालिका निवडणूक एकत्रित लढल्यास महाविकास आघाडीसाठी पोषक स्थिती निर्माण होणार आहे. कारण, सध्यस्थितीला महाविकास आघाडीच्या घटक पक्षांकडे तुल्यबळ उमेदवार कमी आहेत. महायुतीमध्ये क्रमांक 1 आणि क्रमांक 2 यापैकी एकाच उमेदवाराला संधी मिळेल. त्यामुळे दुसऱ्या क्रमांकाचा उमेदवार महाविकास आघाडीच्या तिकीटावर निवडणुकीच्या रिंगणात उतरण्यास पसंती देणार आहे. विधानसभा निवडणुकीत ज्या प्रमाणे भोसरीतून अजित गव्हाणे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला. चिंचवडमधून राहुल कलाटे यांनी शरद पवार गटात प्रवेश केला. त्याप्रमाणे महापालिका निवडणुकीत महायुती झाल्यास ज्यांना संधी मिळणार नाही, ती मंडळी ‘तुतारी’ फुंकताना किंवा बंडाची ‘मशाल’ हातात घेवून महायुतीला टाटा-बाय-बायचा ‘पंजा’ दाखवतील, असे निरीक्षण राजकीय जाणकारांनी नोंदवले आहे.

## महिलांची प्रसूतिपूर्व तपासणी

## प्रसूतिपूर्व तपासणीसह निदानासाठी 'मुक्ता' प्रकल्प

# थॅलेसेमियाच्या धोक्यापासून मुक्ती!

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**देशभरात एक ते दीड लाख लहान मुले थॅलेसेमियाग्रस्त असून, दर वर्षी जन्माला येणाऱ्या मुलांमध्ये १० ते १५ हजार मुले या विकारासह जन्माला येतात. देशात ४ कोटी २० लाखांहून अधिक जण बीटा थॅलेसेमिया वाहक असून, त्यांच्यापासून पुढील पिढीत हा आनुवांशिकरीत्या जाण्याचा धोका आहे. या पार्श्वभूमीवर फेडरेशन ऑफ ऑब्स्टेट्रिक अँड गायनॅकॉलॉजिकल सोसायटीज् ऑफ इंडिया (फॉग्सी) या संस्थेने मुक्ता प्रकल्प हाती घेतला आहे. याअंतर्गत थॅलेसेमियासाठी गर्भवतींची प्रसूतिपूर्व तपासणी, प्रतिबंध आणि निदान याबाबत मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत..**

## थॅलेसेमिया चाचणी करण्यावर भर




फॉग्सी आणि वेहा फाउंडेशनच्या वतीने मुक्ता प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पांतर्गत थॅलेसेमिया प्रतिबंधासाठी मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. याचबरोबर देशव्यापी पातळीवर थॅलेसेमियाबाबत जनजागृती मोहीम राबविली जाणार आहे. फॉग्सी आणि वेहा फाउंडेशनचे पदाधिकारी आणि मुक्ता प्रकल्पाच्या राष्ट्रीय संयोजक डॉ. पूजा लोढा यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या प्रकल्पाअंतर्गत देशभरात गर्भवतीची प्रसूतिपूर्व थॅलेसेमिया चाचणी करण्यावर भर दिला जाणार आहे.गरोदरपणाच्या पहिल्या तीन महिन्यांत रक्त चाचणीद्वारे थॅलेसेमियाचे निदान केले जाते. त्याचबरोबर दोन्ही पालक थॅलेसेमियाचे वाहक असल्यास त्यांचे समुपदेशन करून जन्माला येणारे मूल थॅलेसेमियाग्रस्त असण्याचा धोका समजावून सांगितला जातो. तसेच ते मूल जन्माला न घालता गर्भपात करण्याचा सल्ला दिला जातो. यात डॉक्टरांची भूमिका महत्त्वाची असते. त्यामुळे मुक्ता प्रकल्पामध्ये देशातील १० शहरांमध्ये या वर्षाअखेरपर्यंत डॉक्टरांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. याचबरोबर तीसहून अधिक शहरांमध्ये जनजागृती मोहीम आणि परिषदांचे आयोजन केले जाणार आहे.थॅलेसेमियाबद्दल जनजागृती करून त्याचा प्रतिबंध करणे, हा मुक्ता प्रकल्पाचा उद्देश आहे. यात वैद्यकीय महाविद्यालये, निदान केंद्रे आणि डॉक्टरांना सहभागी करून घेतले जाईल.

## तीस शहरांमध्ये जनजागृती

त्यामुळे मुक्ता प्रकल्पामध्ये देशातील १० शहरांमध्ये या वर्षाअखेरपर्यंत डॉक्टरांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जाणार आहेत. याचबरोबर तीसहून अधिक शहरांमध्ये जनजागृती मोहीम आणि परिषदांचे आयोजन केले जाणार आहे. थॅलेसेमियाबद्दल जनजागृती करून त्याचा प्रतिबंध करणे, हा मुक्ता प्रकल्पाचा उद्देश आहे.

या माध्यमातून पुढील पिढीला थॅलेसेमियामुक्त करण्याच्या दिशेने पावले टाकण्यात येत आहेतमुक्ता प्रकल्पात सुरुवातीच्या टप्प्यात ७० ते ८० डॉक्टरांना प्रशिक्षण दिले जाईल. हे डॉक्टर पुढे मार्गदर्शक म्हणून काम करतील आणि इतर डॉक्टरांना प्रशिक्षित करतील. थॅलेसेमियाबाबत जाहीर करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांमुळे डॉक्टरांना योग्य पद्धतीने निर्णय घेण्यास मदत होईल.फॉग्सी आणि वेहा फाउंडेशनच्या वतीने मुक्ता प्रकल्पाची घोषणा करण्यात आली. या प्रकल्पांतर्गत थॅलेसेमिया प्रतिबंधासाठी मार्गदर्शक सूचना जाहीर करण्यात आल्या आहेत. याचबरोबर देशव्यापी पातळीवर थॅलेसेमियाबाबत जनजागृती मोहीम राबविली जाणार आहे. फॉग्सी आणि वेहा फाउंडेशनचे पदाधिकारी आणि मुक्ता प्रकल्पाच्या राष्ट्रीय संयोजक डॉ. पूजा लोढा यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. या प्रकल्पाअंतर्गत देशभरात गर्भवतीची प्रसूतिपूर्व थॅलेसेमिया चाचणी करण्यावर भर दिला जाणार आहे.गरोदरपणाच्या पहिल्या तीन महिन्यांत रक्त चाचणीद्वारे थॅलेसेमियाचे निदान केले जाते. त्याचबरोबर दोन्ही पालक थॅलेसेमियाचे वाहक असल्यास त्यांचे समुपदेशन करून जन्माला येणारे मूल थॅलेसेमियाग्रस्त असण्याचा धोका समजावून सांगितला जातो. तसेच ते मूल जन्माला न घालता गर्भपात करण्याचा सल्ला दिला जातो. यात डॉक्टरांची भूमिका महत्त्वाची असते.

# सोसायटीचा रखवालदारच निघाला चोर

## साडेआठ लाख रुपयांचा ऐवज चोरी प्रकरणाचा पोलिसांनी लावला छडा

।पुणे।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिंहगड रस्त्यावरील एका सोसायटीतील सदनिकेचे कुलूप तोडून साडेआठ लाख रुपयांचा ऐवज चोरी प्रकरणाचा छडा पोलिसांनी लावला. सोसायटीतील रखवालदाराने साडेआठ लाख रुपयांचा ऐवज लांबविल्याचे तपासात उघडकीस आले असून, या प्रकरणी रखवालदाराला अटक करण्यात आली.**



राकेशकुमार मूलचंद सोनी (वय २९, रा. राम अमिलिया, जि. अनुपपूर, मध्य प्रदेश) असे अटक करण्यात आलेल्या रखवालदाराचे नाव आहे. सोनी हा सिंहगड रस्त्यावरील गणेश मळा परिसरात रखवालदार म्हणून काम करतो. ८ ऑगस्ट रोजी तक्रारदार हे बाहेरगावी गेले होते. सोसायटीतील रखवालदार सोनी याने तक्रारदाराच्या सदनिकेचे कुलूप तोडून आठ लाख ६५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने लांबविले होते. १२ ऑगस्ट रोजी ते गावाहून परतले. तेव्हा चोरीचा प्रकार उघडकीस आला. त्यानंतर तक्रारदाराने पर्वती पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. चोरट्याने शयनगृहातील कपाटातून दहा तोळे सोन्याचे दागिने लांबविल्याचे फिर्यादीत म्हटले होते.पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला.

सोसायटीच्या परिसरातील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. सोसायटीत घरकाम करणारे, रहिवाशी, तसेच रखवालदाराची चौकशी करण्यात आली. तपासात मिळालेल्या माहितीनुसार, रखवालदार सोनी याला संशयावरुन चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आले. सोनी याच्याकडून आठ लाख ६५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले.

## रखवालदारांना कामावर ठेऊ नये

शहरातील अनेक सोसायटीत रखवालदार आहेत. रखवालदारांना कामावर ठेवण्यापूर्वी त्यांची पोलिसांकडून चारित्र्य पडताळणी करून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यांचे नाव, पत्ते घ्यावेत, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पोलीस पडताळणी प्रमाणपत्र असल्याशिवाय रखवालदारांना कामावर ठेऊ नये, अशा सूचना पोलिसांकडून देण्यात आल्या आहेत.

## जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञान
## सायन्स पार्कमध्ये रोबोटिक्स एक्सलन्स सेंटर

# कोडिंगपासून कृत्रिम बुद्धिमत्तेपर्यंत प्रशिक्षण!

### विद्यार्थ्यांसाठी ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही सुरू, सप्ताहांत कार्यशाळांतून प्रत्यक्ष अनुभवाची संधी

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून ॲडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**




कार्यक्रमास सायन्स पार्कचे संस्थापक संचालक प्रवीण तुपे, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. श्रद्धा खंपरिया, लीडरशिप फॉर इक्विटीचे संस्थापक मधुकर रेड्डी आणि रोबोटेक्स इंडियाच्या पायल मनन उपस्थित होते. हा उपक्रम लीडरशिप फॉर इक्विटी आणि रोबोटेक्स इंडियाच्या सहकार्याने राबविण्यात आला आहे.

रोबोटिक्स लॅबमध्ये विद्यार्थ्यांना बेसिक ते ॲडव्हान्स कोडिंगचे प्रशिक्षण दिले जाणार असून, शनिवार, रविवार आणि संध्याकाळच्या वेळेत विशेष कार्यशाळा आयोजित केल्या जाणार आहेत. या सुविधा महापालिका तसेच खासगी शाळांतील विद्यार्थ्यांसाठी खुल्या आहेत.

> महापालिका आयुक्त शेखर सिंह म्हणाले, "कृत्रिम बुद्धिमत्तेचे आणि नवीन तंत्रज्ञानाचे शिक्षण ही काळाची गरज आहे. काही देशांमध्ये हे शिक्षण प्राथमिक स्तरापासून सुरू होते. पिंपरी-चिंचवडमध्ये अशी सुविधा उपलब्ध होणे ही मोठी पावले आहे."
> **-शेखर सिंह,** महापालिका आयुक्त

**रोबोटिक्स व एआयचे प्रशिक्षण शहरातील विद्यार्थ्यांसाठी सुरू**
**सप्ताहांत विशेष कार्यशाळा,**

**महापालिका व खासगी शाळांना प्रवेश विद्यार्थ्यांना जागतिक स्पर्धांसाठी तयार करण्याचे उद्दिष्ट**

---

## खोदकामामुळे डिलक्स चौक-काळेवाडी रस्त्याची दुरवस्था

### नागरिक त्रस्त; अपघातांचा धोका वाढला, महापालिकेकडे तातडीच्या दुरुस्तीची मागणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**'डिलक्स चौक ते काळेवाडी मुख्य रस्त्यावर महापालिकेच्या जलनिस्सारण वाहिनीच्या कामानंतर रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली आहे. गेल्या महिनाभरापासून रस्त्याची दुरुस्ती न झाल्याने खड्डे आणि चिखलामुळे वाहनचालक व पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे. परिसरातील रहिवाशांनी तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत आहे.**



काळेवाडी मुख्य रस्ता हा वाहतुकीसाठी महत्त्वाचा मार्ग आहे. दररोज हजारो वाहने आणि पादचारी या मार्गाने प्रवास करतात. मात्र, खोदकामानंतर रस्त्याची पृष्ठभाग दुरुस्त न झाल्याने पावसाळ्यात खड्ड्यांची संख्या वाढली आहे. चिखलामुळे दुचाकी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.


स्थानिक रहिवासी म्हणाले, "महापालिकेने रस्ता खोदला, पण तो पुन्हा नीट करण्याची तसदी घेतली नाही. पावसामुळे खड्डे आणि चिखल वाढले आहेत, यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत."

कायदा काय सांगतो? महाराष्ट्र महापालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ६३ आणि ६४ नुसार रस्ते, गटारे आणि पाणीपुरवठा यांसारख्या पायाभूत सुविधांची देखभाल आणि दुरुस्ती करणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. खोदकामानंतर रस्त्याची दुरुस्ती न करणे हे या तरतुदींचे उल्लंघन मानले जाते.

**खड्डे आणि चिखलामुळे वाहतूक विस्कळीत**
**महापालिकेच्या हलगर्जीपणावर नागरिक संतप्त**

**तातडीने दुरुस्ती न झाल्यास आंदोलनाचा इशारा**

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### नामाचे प्रेम का येत नाही ?

आज इतकी वर्षे होऊन गेली तरीसुद्धा ज्ञानेश्वर, तुकाराम, समर्थ रामदास यांच्यासारख्या थोर संतांचे नाव टिकून राहिले आहे. याचे खरे कारण हे की, त्यांचे नामावर अत्यंत प्रेम होते. या सर्व संतांच्या वचनांवर आपण विश्वास ठेवतो. त्यांच्याप्रमाणे नामाचे प्रेम आपल्यालाही यावे असे आपल्याला वाटते. पण ते प्रेम आम्हाला का उत्पन्न होत नाही, याचा विचार आपण करायला पाहिजे. त्या नामाला उपमा देताना, ते अमृतापेक्षाही गोड आहे असे त्यांनी सांगितले. नामाला अमृताची उपमा देताना, त्या अमृताच्या पलीकडे दुसरी गोष्टच नाही असे आपण म्हणतो. मग त्या नामाचे प्रेम आम्हाला का बरे नसावे ? तर त्या नामाच्या आड काही तरी येत असले पाहिजे हे खास. ज्याप्रमाणे आपण तोंडात साखर घातल्यावर आम्हाला जर ती गोड लागली नाही, तर तो दोष साखरेचा नसून आमच्याच तोंडाला चव नाही असे आपण म्हणतो, त्याप्रमाणे नामाची गोडी आमच्या अनुभवाला येत नसेल, तर आमच्यामध्येच काही तरी दोष असला पाहिजे खास. नामाचे प्रेम येण्याला बहुतेक लोक काही ना काही अडचणी सांगतात. कुणाला विचारले, “नामाचे प्रेम का येत नाही ?” तर तो सांगतो, “माझे लग्न झाले नाही. ते होऊन प्रपंच, मुलेबाळे हे सर्व झाल्यावर मला नामाचे प्रेम येईल.” पण लग्न करून मुलेबाळे असलेल्या किती लोकांना नामाचे प्रेम लागले आहे ? कोणी म्हणतो, “पैसा नाही म्हणून प्रपंचाची काळजी वाटते आणि नामाचे प्रेम येत नाही.” परंतु अगदी भरपूर पैसा असलेल्या किती लक्षाधीशांनी नामाचे प्रेम मिळविले आहे ? कोणी म्हणतो, “या प्रपंचात बायकोमुले, आजारपण, शेतीवाडी यांच्या व्यापामुळे आम्हांला नामाचे प्रेम लागत नाही;” तर कोणी म्हणतो, “प्रपंचात राहून मला आता कंटाळा आला आहे; मी आता संन्यास घेतो, म्हणजे मला नामाचे प्रेम येईल;” तर कोणी प्रापंचिक दु:खाला कंटाळून अगदी आत्महत्या करायला निघतो. अशा रीतीने, सर्वजण ज्या परिस्थितीत असतात त्या परिस्थितीत नामस्मरणाला अडचणच सांगत असतात. नामाचे प्रेम न यायला खरोखरच परिस्थिती कारणीभूत आहे का, याचा विचार आपण करायला पाहिजे. मला वाटते, नामाचे प्रेम न यायला खरोखर कारण कोणते असेल, तर भगवंत हवा असे आम्हाला मनापासून वाटतच नाही. भगवंत हवा आहे असे वाटणे, हे खरोखर भाग्याचे लक्षण आहे. तुम्हाला खरोखरच भगवंत हवा आहे असे वाटू लागले म्हणजे त्या हवेपणातच त्याच्या प्राप्तीचा मार्ग दिसू लागेल.

**बोधवचन:- नामाची गोडी अशी विलक्षण आहे की, ज्याला ती लागली त्याला स्वतःचे भान राहात नाही. म्हणून नामाला वाहून घ्यावे.**

---

# दारूबंदी, पक्षशिस्त अन् नव्या समीकरणांचा संदेश!



**‘स्टेट’मेंट**

अधिकराव दिवे-पाटील
संस्थापक, संपादक




**अजित पवारांचा नागपूर आणि वर्धा जिल्ह्यांचा नुकताच झालेला दौरा, केवळ एक राजकीय भेट नव्हे तर अनेक स्तरांवर विचार करायला लावणारा ठरला. विदर्भातील जनतेच्या आणि पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या प्रश्नांवर ठाम भूमिका घेणाऱ्या या दौऱ्याने विविध चर्चांना उधाण आले आहे. विशेषतः वर्ध्यातील दारूबंदीचा मुद्दा, पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या तक्रारी, आणि शरद पवार गटातील नेत्याला रुग्णालयात जाऊन दिलेली भेट – हे सगळे घटक या दौऱ्याच्या राजकीय वजनात भर टाकणारे ठरले आहेत.**

### दारूबंदीवर ठाम भूमिका – गांधी विचारांचा सन्मान

वर्धा जिल्ह्यातील दारूबंदीच्या मुद्द्यावर अजित पवारांनी घेतलेली भूमिका निश्चितच प्रशंसनीय आहे. राज्य सरकारचा महसूल बुडला तरी चालेल, पण वर्ध्यातील दारूबंदी उठवणार नाही, असे ठणकावून सांगत त्यांनी गांधी आणि विनोबा भावे यांच्या विचारांचा आदर केला. वर्धा ही गांधी-विनोबांची भूमी आहे, जिथे मूल्याधिष्ठित जीवनाचे आदर्श रुजले गेले. आज त्याच भूमीवर चोरट्या मार्गाने दारूचा पुरवठा सुरू आहे, हे वास्तव दुर्दैवी आहे.

जर दारूबंदी केवळ कागदापुरती मर्यादित राहिली, तर ती ‘मूल्यसंवेदनशील’ समाजाच्या कल्पनेला धक्का देणारी ठरते. अशा परिस्थितीत फक्त दारूबंदी टिकवणं नव्हे, तर तिच्या अंमलबजावणीसाठी कठोर पावले उचलण्याची गरज अजित पवारांनी अप्रत्यक्षपणे अधोरेखित केली आहे. शासनानेही आता याबाबत विशेष पथके, गुप्त तपासणी आणि सीमावर्ती जिल्ह्यांतील चाचण्यांद्वारे चोरटी दारू रोखण्यासाठी ठोस पावले उचलायला हवीत.

### पक्षशिस्त आणि जबाबदारी – स्पष्ट संवादाचे राजकारण

नागपूरमधील राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांशी झालेल्या संवादात अजित पवारांनी “तुम्ही काम करा, म्हणजे अधिकारी तुमचं ऐकतील” असा स्पष्ट संदेश दिला. हा संवाद केवळ पक्षशिस्तीचा इशारा नव्हता, तर कार्यकर्त्यांना स्वतःच्या जबाबदारीची जाणीव करून देणारा होता. नेते आणि कार्यकर्त्यांमधील संबंध हा फक्त तक्रारी ऐकण्यापुरता मर्यादित नसावा, तर लोकसेवेवर आधारित हवाच, हे त्यांनी ठामपणे बजावले.

नेत्यांनी पक्षाच्या खालच्या पातळीवरील कार्यकर्त्यांशी संवाद ठेवणं गरजेचं आहे, हे जितकं खरं, तितकंच कार्यकर्त्यांनीही जनतेशी नाळ जोडून आपलं प्रभाव निर्माण करणं आवश्यक आहे. हा संदेश सुस्पष्टपणे पोहोचवण्यात अजित पवार यशस्वी ठरले.

### नव्या राजकीय समीकरणांची चाहूल?

या दौऱ्यातील सर्वात चर्चास्पद क्षण ठरला तो म्हणजे दादांचा शरद पवार गटातील युवा नेते आणि अनिल देशमुख यांचे पुत्र सलील देशमुख यांना रुग्णालयात जाऊन दिलेली भेट. वैयक्तिक सदिच्छा दाखवणारा हा क्षण राजकीय चर्चा मात्र निर्माण करणारा होता. विशेषतः महायुती आणि शरद पवार गटातील कटुता लक्षात घेता, दादांची ही भेट काही संकेत देणारी मानली जात आहे.

ही केवळ माणुसकी होती की आगामी राजकीय पुनर्रचनेचा सुरवातीचा सूर – हे वेळच ठरवेल. मात्र यामुळे विदर्भातील राजकारणात नव्या समीकरणांची कुजबुज सुरु झाली आहे हे नक्की. अजित पवारांचा विदर्भ दौरा हे एक उदाहरण ठरते – कसे ठाम, मुद्देसूद आणि लोकाभिमुख राजकारण करावे. वर्ध्याच्या दारूबंदीवर ठाम भूमिका, पक्षात शिस्तीचा आग्रह आणि संभाव्य राजकीय समीकरणांची चाहूल – या तिन्ही बाजूंनी या दौऱ्याचे महत्त्व अधोरेखित होते. राजकारण म्हणजे केवळ घोषणाबाजी नव्हे, तर कृतीतील स्पष्टता आणि जबाबदारीची जाण असणे हे नेतृत्वाचे खरे लक्षण आहे. अजित पवारांनी या दौऱ्यातून हे दाखवून दिले आहे. आता खरी जबाबदारी आहे ती प्रशासन आणि कार्यकर्त्यांवर – की ते या भूमिकांना प्रत्यक्षात कसे उतरवतात.

### दारूबंदीचा मुद्दा–वर्ध्यातील जनतेच्या अपेक्षांचा केंद्रबिंदू

वर्धा जिल्हा हा ऐतिहासिक आणि सामाजिक दृष्ट्या संवेदनशील मानला जातो. येथे दारूबंदी कायम ठेवावी का, की त्यावर काही प्रमाणात पुनर्विचार करावा, हा मुद्दा गेल्या काही काळापासून तापलेला आहे. अजित पवारांनी या विषयावर स्थानिक जनतेच्या भावना जाणून घेतल्या आणि प्रशासनासोबत यावर चर्चा केली. यामुळे या दौऱ्याला सामाजिक आणि जनहिताचा पैलूही प्राप्त झाला.

### पक्षाच्या स्थानिक कार्यकर्त्यांच्या तक्रारी आणि संघटनात्मक आव्हाने

या दौऱ्यात अजित पवारांनी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या कार्यकर्त्यांशी संवाद साधत त्यांच्या तक्रारी ऐकल्या. स्थानिक पातळीवरील काही निर्णय, निधीचे वाटप, आणि नेतृत्वाच्या कार्यशैलीबाबत काही नाराजी असल्याचे उघड झाले. अजित पवारांनी त्यांना समजावून सांगत संघटनात्मक एकजूट राखण्याचे आवाहन केले.

### शरद पवार गटातील नेत्याला रुग्णालयात दिलेली भेट – प्रतीकात्मक राजकारण?

या दौऱ्यातील एक लक्षवेधी घटना म्हणजे शरद पवार गटातील एका ज्येष्ठ नेत्याची तब्येत बिघडल्याने त्यांना रुग्णालयात जाऊन अजित पवारांनी भेट घेतली. या भेटीमुळे पुन्हा एकदा विदर्भात ‘राजकीय शिष्टाचार की रणनीतिक पाऊल?’ अशी चर्चा रंगली. विरोधी गटातील नेत्यांशीही सौहार्दाचे संबंध ठेवण्याचा हा प्रयत्न की पुढील काळातील नव्या समीकरणांची चाचपणी, हा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### राजकीय परिणाम आणि आगामी दिशा

या दौऱ्यामुळे विदर्भात अजित पवार गटाने स्वतःची उपस्थिती ठळकपणे दाखवून दिली आहे. लोकांच्या अपेक्षा, स्थानिक मागण्या आणि कार्यकर्त्यांचा उत्साह या सगळ्यांचा परिणाम येत्या विधानसभा आणि स्थानिक स्वराज्य निवडणुकांवर होऊ शकतो. त्याचबरोबर विरोधी गटांशी संवादाची दारे उघडी ठेवत, सत्तेतील भागीदारी बळकट करण्याच्या दृष्टीनेही हा दौरा महत्त्वाचा ठरला आहे.

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

विरोधकांना टोला

## विरोधक रडीचा डाव खेळत आहेत

# मतांची चोरी नसून विरोधकांचा गैरसमज!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**विधानसभा निवडणुकीत कुठेही मतांची चोरी झालेली नाही. विरोधक गैरसमज पसरवण्याचे काम करत आहेत. विरोधक रडीचा डाव खेळत आहेत. त्यांना जनतेच्या प्रश्नांची आणि अडचणीची कोणतीही काळजी नाही, अशी टीका उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी साताऱ्यातील दहिवडी येथे केली.**

### लोकांच्या अडचणी सोडवणे महत्त्वाचे



सातारा जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माण तालुक्यातील कार्यकर्ते अनिल देसाई यांनी राष्ट्रवादी अजित पवार पक्षात आज प्रवेश केला. त्यांच्यासोबत मनोज पोळ, सुनील पाटील (कराड) व अनेक सहकारी यांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील, आमदार सचिन पाटील, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, उदयसिंह पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीत आम्हाला फटका बसला. आमच्या महायुतीच्या जागा कमी निवडून आल्या. त्यानंतर आम्ही आमच्या कामात सुधारणा केली. जनताभिमुख कामे केली. लोकांचा विश्वास जिंकला. यामुळे विधानसभा निवडणुकीत आमच्या तीनही पक्षांना महायुतीला २३८ जागा मिळाल्या. यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आणि त्यांनी महायुतीच्या आणि मतांच्या विषयावर समाजामध्ये गैरसमज पसरविण्याचे काम सुरू केले. विरोधक रडीचा डाव खेळत आहेत.विधानसभा निवडणुकीत कुठेही मतांची चोरी झालेली नाही. मात्र, सध्या पावसामुळे झालेले नुकसान, लोकांच्या अडीअडचणींचे प्रश्न हे महत्त्वाचे आहेत आणि ते सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी व आमचे सर्व सहकारी काम करत आहेत. परंतु, अशा प्रश्नांबाबत विरोधकांना काहीही नाही. यावेळी बाळासाहेब सोळसकर, अनिल देसाई आदींची भाषणे झाली.मी बढाया मारणारा माणूस नाही आणि कोणाचीही उणी दुणी काढत नाही. राजकारणात काम करताना ध्येय आणि विचार घेऊन काम करावे लागते, असा टोला अजित पवार यांनी नाव न घेता जयकुमार गोरे यांना लगावला. माझ्या मतदारसंघात येऊन ते सांगताहेत की तुमचा आमदार काहीही काम करत नाही. त्यांना बदललं पाहिजे.

### राजकारण ध्येय-विचारावर चालतं

विधानसभा निवडणुकीत कुठेही मतांची चोरी झालेली नाही. मात्र, सध्या पावसामुळे झालेले नुकसान, लोकांच्या अडीअडचणींचे प्रश्न हे महत्त्वाचे आहेत आणि ते सोडविण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मी व आमचे सर्व सहकारी काम करत आहेत. परंतु, अशा प्रश्नांबाबत विरोधकांना काहीही नाही.

परंतु माझं त्यांना सांगणं आहे, तुम्ही किती मताने निवडून येता ते इथल्या जनतेला माहीत आहे. परंतु, मी माझ्या मतदारसंघात प्रत्येक वेळी उच्चांकी मताधिक्याने निवडून येतो. यावेळी मी ६२ हजार मताने निवडून आलो आहे, असे मकरंद पाटील यांनी जयकुमार गोरे यांना नाव न घेता सांगितले. सातारा जिल्हा बँकेचे माजी उपाध्यक्ष व राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे माण तालुक्यातील कार्यकर्ते अनिल देसाई यांनी राष्ट्रवादी अजित पवार पक्षात आज प्रवेश केला. त्यांच्यासोबत मनोज पोळ, सुनील पाटील (कराड) व अनेक सहकारी यांनी पक्षात प्रवेश केला. यावेळी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. यावेळी मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील, खासदार नितीन पाटील, आमदार सचिन पाटील, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब सोळसकर, उदयसिंह पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी बोलताना अजित पवार म्हणाले, लोकसभा निवडणुकीत आम्हाला फटका बसला. आमच्या महायुतीच्या जागा कमी निवडून आल्या. त्यानंतर आम्ही आमच्या कामात सुधारणा केली. जनताभिमुख कामे केली. लोकांचा विश्वास जिंकला. यामुळे विधानसभा निवडणुकीत आमच्या तीनही पक्षांना महायुतीला २३८ जागा मिळाल्या. यामुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आणि त्यांनी महायुतीच्या आणि मतांच्या विषयावर समाजामध्ये गैरसमज पसरविण्याचे काम सुरू केले. विरोधक रडीचा डाव खेळत आहेत.

# आरक्षण मिळाल्याशिवाय मुंबई सोडायची नाही

## मुख्यमंत्री फडणवीस यांच्यावर एकेरी भाषेत टीका!

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा समाजाला आरक्षण भेटल्याशिवाय मुंबई सोडायची नाही, सोबतच आंदोलनादरम्यान, एकाही बांधवाने जाळपोळ, दगडफेकीसारखे पाऊल उचलायचे नाही, असा संदेश देऊन मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे यांनी महायुतीच्या सरकारवर आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही एकेरी भाषा वापरत जोरदार टीका केली. बीड जिल्ह्यातील मांजरसुंबा येथे रविवारी इशारा सभेचे आयोजन करण्यात आले होते.**



यावेळी हजारोंच्या संख्येने मराठा बांधव उपस्थित होते. याप्रसंगी बोलताना मनोज जरांगे यांनी सरकारसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लक्ष्य केले. मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे हे २७ तारखेला मुंबईसाठी रवाना होणार आहेत. २९ तारखेला मुंबईतील आझाद मैदानावर त्यांचे आंदोलन असेल. याच आंदोलनाची अंतिम दिशा ठरवण्यासाठी मांजरसुंबा येथे भव्य बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

### २ लाख बांधवांची मुंबईकडे कूच!

काल-परवा फडणवीस यांनी मागणी नसतानाही २९ जाती ओबीसीमध्ये सामील केल्या. मात्र मराठा समाज मागणी करत असतानाही त्याला ओबीसीमध्ये घेतले जात नाही. आपल्या ५८ लाख कुणबी नोंदी असूनही आपल्याला आरक्षण दिले जात नाही. याचबरोबर सरकारने 'लाडक्या बहिणीं'नाही फसवल्याचा आरोप जरांगे यांनी केला.

यावेळी बोलताना मनोज जरांगे यांनी बीडच्या आजच्या बैठकीमुळे सरकारची पळापळ सुरू झाली असून आता आरक्षण भेटल्याशिवाय मुंबई सोडायची नाही, राज्य सरकारने षडयंत्र रचत आंदोलनात काही लोक घुसवले आहेत. त्यांनी काही गोंधळ केल्यास त्यांच्याकडे लक्ष देऊ नका. फडणवीस तुमच्या एका चुकीमुळे नरेंद्र मोदींना पण डाग लागू शकतो हे लक्षात ठेवा, अशा शब्दांमध्ये जरांगे यांनी इशारा दिला. बीडच्या उपाधीक्षकांनी डीजे लावू दिला नाही आणि हे सगळं फडणवीस यांच्या सांगण्यावरून होत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

आरोप-प्रत्यारोप

## युक्रेनमध्ये कुठल्याही देशाचं सैन्य चालणार नाही

# शांततेच्या चर्चेत युरोपीय देशांचा खोडा!

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**गेल्या साडेतीन वर्षांपासून रशिया व युक्रेनमध्ये युद्ध चालू आहे. अमेरिकेसह जगभरातील अनेक देश आता हे युद्ध थांबावं यासाठी प्रयत्न करत आहेत. दरम्यान, रशियाने म्हटलं आहे की "पाश्चात्य देश युक्रेनमधील शांततेसंबंधी चालू असलेल्या चर्चेत अडथळा निर्माण करत आहेत." रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लाव्हरोव यांनी म्हटलं आहे की "युक्रेनमध्ये चालू असलेलं युद्ध थांबावं असं पाश्चात्य देशांना वाटत नाही. त्यामुळे युद्धविरामाच्या चर्चा बंद होतील किंवा त्यात अडथळे येथील अशा कारवाया पाश्चात्य देश करत आहेत."**

## पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणात घट



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की ते रशिया व युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र, हे दोन्ही देश एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत चर्चेला नकार देत आहेत. सर्गेई लाव्हरोव पाश्चात्य देशांवर टीका करताना म्हणाले, "हे लोक कुठलीही कारणं पुढे करून चर्चा थांबवतात." सर्गेई युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्यावर टीका करत म्हणाले, "ते त्यांच्या अटी व शर्तींसह आमचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना भेटू इच्छितात. ट्रम्प व पुतिन यांनी एकत्र येत चर्चेसाठी एक व्यासपीठ तयार केलं आहे. मात्र, युक्रेन आता ते व्यासपीठ नष्ट करू पाहतोय."ट्रम्प व पुतिन यांच्यातील चर्चेनंतर आम्हाला आशेचा किरण दिसू लागला होता. हे युद्ध थांबेल असं वाटत होतं. आम्ही अजूनही आशावादी आहोत की ही गोष्ट युक्रेनच्याही लक्षात येईल.लाव्हरोव म्हणाले की "वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी पुतिन यांना भेटण्यासाठी अटी घातल्या आहेत. अशी कुठलीही भेट होण्याआधी पाश्चात्य देश व अमेरिकेने युक्रेनला सुरक्षिततेची हमी द्यावी. जेणेकरून रशिया पुन्हा हल्ला करणार नाही. चर्चा करत असताना अशा अटींचा अडथळा निर्माण करणं योग्य नाही. तसेच युक्रेनमध्ये युरोपच्या सैन्याची उपस्थितीत आम्ही अजिबात सहन करणार नाही"दरम्यान, रशियाने दावा केला आहे की युक्रेनने शनिवारी मध्यरात्री रशियावर ड्रोन हल्ले केले. या हल्ल्यामुळे त्यांच्या पश्चिम कुर्स्क प्रांतातील अणुऊर्जा प्रकल्पाशी संबंधित ठिकाणी आग लागली होती. अशाने युद्ध आणखी भडकेल, असंही रशियाने म्हटलं आहे.अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की ते रशिया व युक्रेनमधील युद्ध थांबवण्यासाठी प्रयत्न करत आहेत. मात्र, हे दोन्ही देश एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करत चर्चेला नकार देत आहेत. सर्गेई लाव्हरोव पाश्चात्य देशांवर टीका करताना म्हणाले, "हे लोक कुठलीही कारणं पुढे करून चर्चा थांबवतात." सर्गेई युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमीर झेलेन्स्की यांच्यावर टीका करत म्हणाले, "ते त्यांच्या अटी व शर्तींसह आमचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांना भेटू इच्छितात. ट्रम्प व पुतिन यांनी एकत्र येत चर्चेसाठी एक व्यासपीठ तयार केलं आहे. मात्र, युक्रेन आता ते व्यासपीठ नष्ट करू पाहतोय."ट्रम्प व पुतिन यांच्यातील चर्चेनंतर आम्हाला आशेचा किरण दिसू लागला होता. हे युद्ध थांबेल असं वाटत होतं. आम्ही अजूनही आशावादी आहोत की ही गोष्ट युक्रेनच्याही लक्षात येईल.लाव्हरोव म्हणाले की "वोलोदिमीर झेलेन्स्की यांनी पुतिन यांना भेटण्यासाठी अटी घातल्या आहेत. अशी कुठलीही भेट होण्याआधी पाश्चात्य देश व अमेरिकेने युक्रेनला सुरक्षिततेची हमी द्यावी. जेणेकरून रशिया पुन्हा हल्ला करणार नाही. चर्चा करत असताना अशा अटींचा अडथळा निर्माण करणं योग्य नाही. तसेच युक्रेनमध्ये युरोपच्या सैन्याची उपस्थितीत आम्ही अजिबात सहन करणार नाही"दरम्यान, रशियाने दावा केला आहे की युक्रेनने शनिवारी मध्यरात्री रशियावर ड्रोन हल्ले केले. या हल्ल्यामुळे त्यांच्या पश्चिम कुर्स्क प्रांतातील अणुऊर्जा प्रकल्पाशी संबंधित ठिकाणी आग लागली होती. अशाने युद्ध आणखी भडकेल, असंही रशियाने म्हटलं आहे.

### चालू असलेलं युद्ध थांबावं

अमेरिकेसह जगभरातील अनेक देश आता हे युद्ध थांबावं यासाठी प्रयत्न करत आहेत. दरम्यान, रशियाने म्हटलं आहे की "पाश्चात्य देश युक्रेनमधील शांततेसंबंधी चालू असलेल्या चर्चेत अडथळा निर्माण करत आहेत." रशियाचे परराष्ट्र मंत्री सर्गेई लाव्हरोव यांनी म्हटलं आहे की "युक्रेनमध्ये चालू असलेलं युद्ध थांबावं असं पाश्चात्य देशांना वाटत नाही.

# राहुल गांधींच्या सुरक्षेत मोठी चूक

## रॅली दरम्यान कार्यकर्त्याने राहुल गांधींना गालावर केलं किस

**। नवी दिल्ली ।**
**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी हे केंद्रीय निवडणूक आयोगाला सातत्यानं लक्ष्य करत आहेत. मतदार याद्यांमधील कथित अनियमिततेच्या आरोपांवरून निवडणूक आयोगावर आणि भारतीय जनता पक्षावर मत चोरीचा आरोप करत राहुल गांधी घणाघाती टीका करत आहेत.**



या संदर्भात काही दिवसांपूर्वी राहुल गांधी यांनी एक पत्रकार परिषद घेत काही पुराव्यांचेही सादरीकरण केलं होतं. तेव्हापासून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. दरम्यान, यातच राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी बिहारमध्ये 'व्होटर अधिकार यात्रा' काढली आहे. या यात्रेच्या माध्यमातून राहुल गांधी आणि तेजस्वी यादव बिहारच्या विविध शहरात जात सभा आणि मेळावे घेत आहेत. आज बिहारच्या पूर्णिया-अररिया मार्गावर व्होटर अधिकार यात्रेत बाईक रॅलीचं आयोजन करण्यात आलं होतं.

यावेळी राहुल गांधींच्या सुरक्षेत मोठी चूक झाल्याचं पाहायला मिळालं.बाईक रॅली सुरू असताना एका व्यक्तीने अचानक राहुल गांधींच्या बाईक जवळ जाऊन राहुल गांधी यांना मिठी मारली आणि गालावर चुंबन घेण्याचा प्रयत्न केला. मात्र, लगेच सुरक्षा रक्षकाने त्या व्यक्तीला तात्काळ बाजूला ओढलं आणि जोरात कानशिलात लगावली. या संपूर्ण घटनेचा व्हिडीओ आता सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांची 'व्होटर अधिकार यात्रा' रविवारी बिहारच्या अररिया या ठिकाणी पोहोचली असता त्यांनी पत्रकार परिषद घेत संबोधित केलं.

### मी एक सल्ला नक्कीच देईन

राहुल गांधी आणि तेजस्वी यादव यांनी पत्रकार परिषदेच्या माध्यमातून संबोधित केलं. यावेळी आरजेडीचे नेते तेजस्वी यादव यांनी केंद्रीय मंत्री चिराग पासवान यांच्यावर टीका केली. चिराग पासवान यांच्याबद्दल बोलताना तेजस्वी यादव म्हणाले की, "चिराग पासवान हा आजच्या चर्चेता मुद्दा नाही. पण तरीही त्यांना मी एक सल्ला नक्कीच देईन.

# ‘पारु’ मालिकेतील ‘ही’ अभिनेत्री आहे चिडका बिब्बा



‘झी मराठी’ वाहिनीवरील ‘पारू’ मालिकेला सध्या प्रेक्षकांचा चांगलाच प्रतिसाद मिळताना दिसत आहे. लोकप्रियतेच्या शिखरावर असलेल्या या मालिकेत नुकतीच दिशा म्हणजेच अभिनेत्री पूर्वा शिंदेची जबरदस्त एन्ट्री पाहायला मिळाली. ५ आलिशान गाड्या, ११ बॉडीगार्ड्स आणि वेस्टर्न लूकमध्ये दिशाची एन्ट्री झाली. यामुळे किर्लोस्कर कुटुंबासह पारूला धक्काच बसला. तीन महिन्यांनंतर जेलमधून आलेली दिशा आता किर्लोस्कर कुटुंबाचा सर्वनाश करण्यासाठी प्रयत्न करताना दिसत आहे. तिने स्वतःची नवी कंपनी सुरू केली आहे. त्यामुळेच सध्या दिशा म्हणजे पूर्वा शिंदे चर्चेत आली आहे. अलीकडेच अभिनेत्री पूर्वा शिंदेने ‘अल्ट्रा मराठी बझ’ या युट्यूब चॅनेलशी संवाद साधला. यावेळी तिने मालिकेतील कलाकारांबरोबर असलेल्या बॉन्डबद्दल सांगितलं. तसंच पूर्वा मालिकेतील एका अभिनेत्रीला चिडका बिब्बा म्हणाली.पूर्वा शिंदे म्हणाली, “माझं सगळ्यांशी खूप छान बॉन्ड आहे. सध्या माझ्या जवळची व्यक्ती आहे चिंटू म्हणजे संजना काळे. आम्ही कुठल्याही कार्यक्रमासाठी गेलो, तर तिथे आम्ही एकाच रुममध्ये राहतो. ती मला भरवते सुद्धा. म्हणजे तिला माहितीये, घरी माझे आई-बाबा त्यांच्या हाताने जेवण भरवतात. हे तिच्या नेहमी लक्षात असतं. त्यामुळे मी आवरत असेल, टाइमपास करत असेल तर ती मला पटापट घास भरवणार. इतकी माझी काळजी घेते. तिच्यासारखीच पारू आहे. रोज पॅकअप झाल्यावर कितीही तिला उशीर होऊ दे, ती दारातून हाक मारते पूर्वा, पूर्वा. फक्त हाय करण्यासाठी ती हे करते.”पुढे पूर्वा म्हणाली की, मला कधी वाईट वाटलं, मी कफ्यूज असेल किंवा आयुष्याबद्दल काही धडे द्यायचे असतील तर मुग्धा ताईकडून ते नेहमी मिळतं. मी मगाशी एका मुलाखतीमध्ये चिडका बिब्बा म्हटल्यावर मुग्धा ताईचं नाव घेतलं होतं. कारण ती माझ्यावर बऱ्याचदा चिडते. कारण मी पण तशी वागते. मात्र ती सर्वात चांगल्या मनाची आहे. आमच्यात खूप चर्चा होतात. ती मला खूप छान मार्गदर्शन करते. तसंच श्रुतकिर्ती सावंत माझी सखी आहे. मला वाटतं अशी सहकलाकार प्रतीक्षा मुंगेकरनंतर ती आहे.

## तुझेच मी गीत गात आहे

स्टार प्रवाह’ वाहिनीवरील लोकप्रिय मालिकांपैकी एक म्हणजे ‘तुझेच मी गीत गात आहे’. अभिनेता अभिजीत खांडकेकर, उर्मिला काठोरे, प्रिया मराठे, तेजस्विनी लोणारी, अवनी तायवाडे, अवनी जोशी, दीप्ती जोशी, पल्लवी वैद्य असे अनेक तगडे कलाकार मंडळी असलेली ‘तुझेच मी गात आहे’ मालिका खूप गाजली. टीआरपीच्या शर्यतीतही मालिका अव्वल स्थानावर होती. पण, गेल्या वर्षी १६ जूनला ‘तुझेच मी गीत गात आहे’ मालिकेचा शेवट झाला. ज्या क्षणाची प्रेक्षक दोन वर्ष आतुरतेने वाट पाहत होते, त्या क्षणाने या मालिकेचा शेवट झाला. मल्हारला स्वरा त्याची खरी लेक असल्याचं दाखवत ‘तुझेच मी गीत गात आहे’ मालिकेने प्रेक्षकांचा निरोप घेतला. पण, ‘तुझेच मी गीत गात आहे’ मालिकेतील मल्हार म्हणजे अभिनेता अभिजीत खांडकेकर सध्या काय करतो? जाणून घ्या... ‘तुझेच मी गीत गात आहे’ मालिकेने निरोप घेतल्यानंतर अभिजीत खांडकेकर वेगवेगळ्या भूमिकांमध्ये पाहायला मिळत आहे.

## बुम बुम बोंबला’वर डान्स!



गेल्या काही दिवसांपासून ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमातील कलाकार नवनवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत. लवकरच प्रसाद खांडेकर दिग्दर्शित ‘चिकी चिकी बुबूम बुम’ चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. या चित्रपटात अभिनेता स्वप्नील जोशी, प्राजक्ता माळी, प्रार्थना बेहेरे, प्रथमेश शिवलकर, रोहित माने, वनिता खरात अशी तगडी कलाकार मंडळी पाहायला मिळणार आहेत. सध्या या चित्रपटातील एक गाणं खूप चर्चेत आहे. त्याच गाण्यावर प्राजक्ता माळी आणि मृण्मयी देशपांडेने जबरदस्त डान्स केला आहे.अभिनेत्री प्राजक्ता माळी आणि मृण्मयी देशपांडेचा हा जबरदस्त डान्स व्हिडीओ प्राजक्ताच्या फॅन पेजवर शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये प्राजक्ता गुलाबी रंगाच्या नऊवारीमध्ये तर मृण्मयी केशरी रंगाच्या नऊवारीत दिसत आहे. दोघी मराठमोळ्या लूकमध्ये खूपच सुंदर दिसत आहेत.या व्हिडीओमध्ये प्राजक्ता व मृण्मयी ‘चिकी चिकी बुबूम बुम’ चित्रपटातील ‘बुम बुम बोंबला’ गाण्यावर डान्स करत आहेत. या गाण्यातील हुकस्टेप दोघी करताना दिसत आहेत. प्राजक्ता व मृण्मयीचा हा डान्स व्हिडीओ सध्या खूप चर्चेत आला आहे.प्राजक्ता माळी व मृण्मयी देशपांडेच्या या डान्स व्हिडीओवर अनेक चाहत्यांच्या प्रतिक्रिया उमटल्या आहेत. आतापर्यंत एक लाखांहून अधिक जणांनी हा व्हिडीओ पाहायला आहे. तसंच पाच हजारांहून अधिक जणांनी हा व्हिडीओ लाइक केला आहे.दरम्यान, २८ फेब्रुवारीला प्रदर्शित होणाऱ्या ‘चिकी चिकी बुबूम बुम’ चित्रपटात अभिनेत्री नम्रता संभेरावचा कॅमिओ आहे. या कॅमिओबद्दल नम्रता म्हणाली होती, “‘चिकी चिकी बुबूम बुम’ चित्रपटात माझा छोटा कॅमिओ आहे. अवघ्या चार वाक्यांची भूमिका आहे. ही छोटी भूमिका खूप मोठा परिणाम करते. तर आता मी वेगळं काम केलं आहे, जे चार वाक्यात संपणार आहे. पण अत्यंत महत्वाचं काम केलंय. प्रसादचे मला मनापासून आभार मानायचे आहेत.गेल्या काही दिवसांपासून ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ कार्यक्रमातील कलाकार नवनवीन चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येत आहेत.

## ‘पारु’मध्ये मोठा ट्विस्ट!

‘पारू’ मालिकेत सध्या दिशाची रिएन्ट्री झाल्याचा सीक्वेन्स चालू आहे. अनुष्का आणि आदित्यच्या साखरपुड्यात दिशा अचानक अवतरते आणि स्वत:च्या सख्ख्या बहिणीला धमकी देते. जेलमधून सुटल्यावर आता तिने किर्लोस्कर कुटुंबीयांविरोधात नवीन कारस्थान रचायला सुरुवात केली आहे. अहिल्यादेवींनी पारूला किर्लोस्कर कंपनीची ब्रँड अँबॅसेडर करण्याचा निर्णय घेतलेला आहे. यानिमित्ताने मोठ्या सेलिब्रेशनचं आयोजन करण्यात आलं आहे. ‘पारू’ आता महाराष्ट्राची मॉडेल होणार आहे. पण, याच सोहळ्याच किर्लोस्कर कुटुंबीयांना उद्धवस्त करण्यासाठी दिशा एन्ट्री घेणार आहे. तिने एका खेळण्याच्या गाडीत बॉम्ब लपवलेला असतो.आता दिशाने ठेवलेला बॉम्ब पारु आणि आदित्य डीफ्युज करतील की, या सगळ्यात कोणाचा जीव जाईल? असा प्रश्न प्रेक्षकांच्या मनात निर्माण झालेला आहे. आदित्यला शोधाशोध केल्यावर दिशाने लपवलेला हा बॉम्ब सापडतो. बॉम्ब पाहिल्यावर सुरुवातीला त्याच्या पायाखालची जमीन सरकते. इतक्यात पारू आदित्यवळ पोहोचते, तिला पाहताक्षणी तो म्हणतो, “पारू बॉम्ब सापडलाय...” तो बॉम्ब पाहून पारू सुद्धा खूप घाबरते.



# ‘अप्सरा आली’ गाण्यावर मराठी अभिनेत्रींचं सुंदर नृत्यसादरीकरण

२०१० साली आलेला ‘नटरंग’ हा मराठीतला आजवरचा एक ‘कल्ट सिनेमा’ म्हणून ओळखला जातो. रवी जाधवने या सिनेमाचं दिग्दर्शन केलं असून अभिनेते अतुल कुलकर्णींनी या सिनेमात मध्यवर्ती भूमिका साकारली होती. तसंच त्यांच्याबरोबर अभिनेत्री सोनाली कुलकर्णीसुद्धा होती. ‘नटरंग’ सिनेमा हा तमाशाप्रधान असल्याने या सिनेमातील प्रत्येक गाण्याने रसिकांना मंत्रमुग्ध केलं. ‘नटरंग’ची जवळपास सर्वच गाणी तेव्हाही लोकप्रिय होती आणि आजूनही त्यांची क्रेझ काही कमी झालेली नाही. यातीलच एक गाणं म्हणजे ‘अप्सरा आली’.सोनाली कुलकर्णीने सिनेमात या गाण्यावर अप्रतिम नृत्यसादरीकरण केलं आहे, यामुळेच ती मराठी इंडस्ट्रीत ‘अप्सरा’ म्हणून ओळखली जाते.‘नटरंग’च्या १५ वर्षांनीसुद्धा त्यामधील ‘अप्सरा



आली’ या गाण्याचा करिश्मा काही कमी झालेला नाही. आजही हे गाणं चाहत्यांमध्ये तितकंच लोकप्रिय आहे.‘अप्सरा आली’ या गाण्यावरील डान्सचे अनेकजण व्हिडिओ शेअर करत असतात. अशातच आता या गाण्यावर मराठी अभिनेत्रींनासुद्धा सुंदर असं सादरीकरण केलं आहे, या अभिनेत्री म्हणजे वल्लरी विराज आणि आलापिनी निसळ. दोघी सोशल मीडियावर बऱ्याच सक्रीय असतात आणि सोशल मीडियाद्वारे त्यांच्या डान्सचे व्हिडिओ शेअर करत असतात. अशातच त्यांनी ‘अप्सरा आली’ गण्यावरील सादरीकरणाचा व्हिडिओ शेअर केला आहे.‘अप्सरा आली’ या गाण्यावर नृत्य करताना वल्लरी आणि आलापिनी यांच्या चेहऱ्यावरील सुंदर हावभाव लक्ष वेधून घेत आहेत. तसंच वल्लरी आणि आलापिनी यांनी स्वत:च्या काही अधिकच्या डान्स स्टेप्स केल्या आहेत, ज्या चाहत्यांच्याही पसंतीस पडल्या आहेत. शिवांशू सोनीच्या नृत्यशाळेत वल्लरी आणि आलापिनी यांनी ‘अप्सरा आली’वर डान्स केला आणि याची झलक सोशल मीडियावर शेअर केली आहे.

ऑस्ट्रेलियाचा विजय

## ऑस्ट्रेलियाचा दक्षिण आफ्रिकेवर मोठा विजय

# हेड-मार्शची विक्रमी भागीदारी!

## वनडे संघात मोठा बदल होऊ शकतो

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलिया या दोन्ही संघांमध्ये ३ वनडे सामन्यांची मालिका सुरू आहे. या मालिकेतील तिसरा सामना ग्रेट बॅरियर रीफ एरिनामध्ये पार पडला. या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा संघ नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीसाठी मैदानात आला. ऑस्ट्रेलियाकडून फलंदाजी करताना मिचेल मार्श आणि ट्रॅव्हिस हेड यांनी मोठा विक्रम मोडून काढला आहे. यासह दक्षिण आफ्रिकेवर मोठा विजय देखील मिळवला आहे.**



तिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्या डावात फलंदाजी करताना सलामीवीर ट्रॅव्हिस हेड आणि मिचेल मार्श यांनी दमदार फलंदाजी केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी २५० धावा जोडल्या. ही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना कुठल्याही संघाने पहिल्या विकेटसाठी केलेली सर्वात मोठी भागीदारी ठरली. याआधी इंग्लंडच्या मार्कस ट्रेस्कोथिक आणि विक्रम सोलंकी यांच्या जोडीने मिळून २०० धावांची भागीदारी केली होती. आता ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी हा मोठा विक्रम मोडून काढला आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांअखेर २ गडी बाद ४३१ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून सलामीला आलेल्या ट्रॅव्हिस हेडने १०३ चेंडूत १४२ धावांची खेळी केली. तर कर्णधार मिचेल मार्शने १०० धावा केल्या. दोघांनी मिळून २५० धावांची विक्रमी भागीदारी केली. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कॅमेरून ग्रीनने ऑस्ट्रेलियाकडून खेळताना दुसरं सर्वात जलद शतक झळकावलं. त्याने ४७ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. यादरम्यान त्याने ११८ धावांची खेळी केली. तर शेवटी ॲलेक्स कॅरीने नाबाद ५० धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेने मालिकेतील सुरवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये दमदार विजय मिळवला होता. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ४३२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेकडून डेवाल्ड ब्रेव्हिसने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. तर उर्वरित एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेचा डाव १५५ धावांवर आटोपला. यासह ऑस्ट्रेलियाने हा सामना २७६ धावांनी आपल्या नावावर केला.तिसऱ्या सामन्यात नाणेफेक जिंकून पहिल्या डावात फलंदाजी करताना सलामीवीर ट्रॅव्हिस हेड आणि मिचेल मार्श यांनी दमदार फलंदाजी केली. दोघांनी पहिल्या

## पहिल्या विकेटसाठी २५० धावा

ट्रॅव्हिस हेड आणि मिचेल मार्श यांनी दमदार फलंदाजी केली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी २५० धावा जोडल्या. ही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना कुठल्याही संघाने पहिल्या विकेटसाठी केलेली सर्वात मोठी भागीदारी ठरली. याआधी इंग्लंडच्या मार्कस ट्रेस्कोथिक आणि विक्रम सोलंकी यांच्या जोडीने मिळून २०० धावांची भागीदारी केली होती.

विकेटसाठी २५० धावा जोडल्या. ही दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळताना कुठल्याही संघाने पहिल्या विकेटसाठी केलेली सर्वात मोठी भागीदारी ठरली. याआधी इंग्लंडच्या मार्कस ट्रेस्कोथिक आणि विक्रम सोलंकी यांच्या जोडीने मिळून २०० धावांची भागीदारी केली होती. आता ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी हा मोठा विक्रम मोडून काढला आहे. या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना ऑस्ट्रेलियाने ५० षटकांअखेर २ गडी बाद ४३१ धावा केल्या. ऑस्ट्रेलियाकडून सलामीला आलेल्या ट्रॅव्हिस हेडने १०३ चेंडूत १४२ धावांची खेळी केली. तर कर्णधार मिचेल मार्शने १०० धावा केल्या. दोघांनी मिळून २५० धावांची विक्रमी भागीदारी केली. त्यानंतर फलंदाजीला आलेल्या कॅमेरून ग्रीनने ऑस्ट्रेलियाकडून खेळताना दुसरं सर्वात जलद शतक झळकावलं. त्याने ४७ चेंडूत आपलं शतक पूर्ण केलं. यादरम्यान त्याने ११८ धावांची खेळी केली. तर शेवटी ॲलेक्स कॅरीने नाबाद ५० धावा केल्या. दक्षिण आफ्रिकेने मालिकेतील सुरवातीच्या दोन्ही सामन्यांमध्ये दमदार विजय मिळवला होता. मालिकेतील तिसऱ्या सामन्यात दक्षिण आफ्रिकेला ४३२ धावा करायच्या होत्या. या धावांचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या दक्षिण आफ्रिकेकडून डेवाल्ड ब्रेव्हिसने सर्वाधिक ४९ धावांची खेळी केली. तर उर्वरित एकाही फलंदाजाला मोठी खेळी करता आली नाही. दक्षिण आफ्रिकेचा डाव १५५ धावांवर आटोपला. यासह ऑस्ट्रेलियाने हा सामना २७६ धावांनी आपल्या नावावर केला.

# मलानने मोडला रैनाचा मोठा विक्रम!

## टी-20 क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा ठरला पाचवा फलंदाज

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**इंग्लंडमध्ये सध्या द हंड्रेड क्रिकेट लीग स्पर्धेचा थरार सुरू आहे. या स्पर्धेत फलंदाज धावांचा पाऊस पाडत आहे. या स्पर्धेत ओव्हल इनविंसिबल्स आणि नॉर्दर्न सुपरचार्जर्स या दोन्ह संघांमध्ये झालेल्या सामन्यात ओव्हल इनविंसिबल्स संघाकडून फलंदाजी करताना डेव्हिड मलानने दमदार खेळी केली. त्याने २४ चेंडूंचा सामना करत ३४ धावा चोपल्या.**



या ३४ धावांच्या खेळीसह त्याने टी- २० क्रिकेटमध्ये मोठा कारनामा केला आहे. त्याने टी-२० क्रिकेटमध्ये एकाच देशासाठी सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत भारताचा माजी फलंदाज सुरेश रैनाला मागे टाकलं आहे.डेव्हिड मलान हा टी-२० क्रिकेटमधील आक्रमक फलंदाजांपैकी एक आहे. टी-२० क्रिकेटमध्ये त्याने अनेक मोठे विक्रम आपल्या नावावर केले आहेत. त्याने इंग्लंडमध्ये टी-२० क्रिकेटमधील २४० सामन्यांमध्ये फलंदाजी करताना ३२.४५ च्या सरासरीने ६५५३ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने ३ शतकं आणि ४३ अर्धशतकं झळकावली

## अर्धशतकांच्या साहाय्याने ७३९८ धावा

विराटने आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे.रोहितच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये ८४३६ आणि यादीत तिसऱ्या स्थानी असलेल्या शिखर धवनच्या नावे ७६२६ धावा करण्याची नोंद आहे. तर या यादीत चौथ्या स्थानी असलेल्या जेम्स विंसने २४३ सामन्यांमध्ये फलंदाजी करताना ५३ अर्धशतकांच्या साहाय्याने ७३९८ धावा केल्या आहेत.

आहेत.

यासह त्याने एकाच देशासाठी सर्वाधिक धावा करण्याच्या विक्रमात त्याने सुरेश रैनाला मागे टाकलं आहे. सुरेश रैनाच्या नावे टी-२० क्रिकेटमध्ये ६५५३ धावा करण्याची नोंद आहे. आता सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तो पाचव्या स्थानी पोहोचला आहे.टी-२० क्रिकेटमध्ये एका देशासाठी सर्वाधिक धावा करण्याचा विक्रम हा भारताचा स्टार फलंदाज विराट कोहलीच्या नावावर आहे. विराट कोहलीने भारतात टी-२० क्रिकेटमध्ये फलंदाजी करताना २७८ डावात ४२.३७ च्या सरासरीने ९७०४ धावा केल्या आहेत.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। सोमवार ।

। दि. 25 ऑगस्ट 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## तंत्रज्ञान विकासामुळे समाजोन्नती व लोककल्याणाला चालना

# नव तंत्रज्ञान विकसित भारतासाठी उपयुक्त - डॉ. सुरेश गोसावी

### शिक्षण विश्व : पीसीसीओईआर येथे पाचव्या एशियाकॉन -25 आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड : भारतात ऊर्जा, कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल तंत्रज्ञानाचा विकास आणि वापर केला जात आहे. समाजोन्नतीसाठी आवश्यक असणाऱ्या तंत्रज्ञानाचा विकास केल्यामुळे लोक कल्याणकारी व्यवस्था निर्माण करण्यासाठी मदत मिळते. गरजेनुसार तंत्रज्ञान विकसित होत असून यामुळे देश प्रगतीपथाकडे वाटचाल करीत आहे. नव तंत्रज्ञान विकसित भारतासाठी उपयुक्त ठरते आहे, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी व्यक्त केले..**




पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित रावेत येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँन्ड रिसर्च (पीसीसीओईआर) आणि आयईईई यांच्या सहयोगाने आयोजित केलेल्या पाचव्या 'एशियाकॉन -२५' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्‌घाटन डॉ. गोसावी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सावी इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक डॉ. विकास पाटील, आयईईईचे डॉ. शशिकांत पाटील, कॅपजेमिनीचे मोनिश के., उद्योजक नरेंद्र लांडगे, पीसीसीओईआरचे संचालक डॉ. हरिश तिवारी, डॉ. राहुल मापारी, डॉ. विजयालक्ष्मी कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी 'एशियाकॉन' स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले.

या परिषदेसाठी सोळा देशांमधून आलेल्या दोन हजार २६२ प्रवेशिकां मधून २५६ शोध निबंधांचे सादरीकरण करण्यात आले, असे डॉ. राहुल मापारी यांनी प्रास्ताविकात सांगितले.

अशाप्रकारच्या परिषदे मधून संशोधकांना विज्ञान तंत्रज्ञानातील प्रगतीची माहिती होते. नवकल्पना, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, विचारांची देवाणघेवाण होते. पुढील वाटचालीसाठी योग्य दिशा मिळते. आव्हानांचा सामना करत त्यावर मात करा, असे मार्गदर्शन डॉ. विकास पाटील यांनी केले.

'आयईईई'ने संशोधकांना व्यासपीठ निर्माण करून दिले आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर संस्थेचा नावलौकिक खूप मोठा आहे. पीसीईटीच्या सहयोगाने पाच वर्षांपासून आंतरराष्ट्रीय परिषदेचे यशस्वी आयोजन केले जात आहे, यांचा आनंद आणि समाधान आहे असे डॉ. शशिकांत पाटील म्हणाले.

डॉ. हरिश तिवारी यांनी परिषदेच्या आयोजनाचा उद्देश स्पष्ट केला. यावेळी विविध विद्याशाखेचे प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. मैथिली अंधारे यांनी केले. आभार डॉ. संतोष रणदिवे यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्मताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या.

## गुणवंत विद्यार्थ्यांच्या बक्षिसासाठी एक कोटींचा खर्च

### महापालिका आयुक्त शेखर सिंह यांची स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महापालिकेच्या माध्यमिक शाळांमध्ये दहावीच्या परीक्षेमध्ये ८० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिस दिले जाते. त्यानुसार २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामध्ये शिष्यवृत्ती अदा करण्यासाठी १ कोटी ६ लाख ७५ हजार रुपयांचा खर्च येणार आहे. त्यास महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी स्थायी समितीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने महापालिका शाळेत शिक्षण घेत असलेल्या व दहावीच्या परीक्षेमध्ये चांगले गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान केला जातो. त्यांना प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती दिली जाते. त्यामध्ये ९० टक्के व त्यापेक्षा जास्त गुण मिळाल्यास एक लाख रुपयांचे बक्षिस दिले जाते. तसेच ८५ ते ८९ टक्के गुण मिळाल्यास ५० हजार रुपये व ८० ते ८४.९९ टक्के गुण मिळाल्यास २५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाते. त्यानुसार, १ लाखाचे मानकरी २८ विद्यार्थी ठरले आहेत. तर ५० हजार रुपये रक्कम ८२ विद्यार्थ्यांना मिळणार आहे. तसेच १३५ विद्यार्थ्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये शिष्यवृत्ती दिली जाणार आहे. तर ८ दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्येकी ५० हजार रुपयांचे बक्षिस दिले जाणार आहे. त्यासाठी १ कोटी ६ लाख ७५ हजार रुपये खर्च होणार आहे.

ही रक्कम विद्यार्थ्यांच्या बँक खात्यावर थेट देण्यात येणार आहे. ही योजना फक्त महापालिका शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच आहे.

## शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी - प्रा. राव तुमाला

### 25' आणि चौथ्या 'आयमेस-25' आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**दहा पंधरा वर्षांत भारताने विज्ञान - तंत्रज्ञान क्षेत्रात झपाट्याने विकास केला आहे. नवकल्पना, निर्मिती, उत्पादन, कृत्रिम बुद्धिमत्तेचा खुबीने वापर केला जात आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर तंत्रज्ञान क्षेत्रात भारताला अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत, असे प्रतिपादन मायक्रो इलेक्ट्रॉनिक पॅकिंग इनोव्हेशन्सचे पुरस्कर्ते प्रा. राव तुमाला यांनी केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील शैक्षणिक संकुलातील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) येथे नवव्या 'आयसीसीयुबीईए-२५' आणि चौथ्या 'आयमेस-२५' या दोन आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करण्यात आले. ही परिषद दोन दिवसांची असून 'संगणन, संप्रेषण, नियंत्रण आणि ऑटोमेशन' तसेच 'यांत्रिक अभियांत्रिकी मधील नवकल्पना' या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सादरीकरण, चर्चा होणार आहे. याप्रसंगी प्रा. तुमाला यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी आयईईईचे पुणे विभागीय प्रमुख डॉ. अमर बुचडे, पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, 'आयसीसीयुबीईए-२५' जनरल चेअर डॉ. जयश्री कट्टी, 'आयमेस-२५'जनरल चेअर डॉ. नरेंद्र देवरे आदी उपस्थित होते.

तंत्रज्ञानाच्या सहाय्याने समाजाला चांगल्या सेवा मिळाल्या पाहिजेत. त्यासाठी नवकल्पना, संशोधनाला चालना मिळावी, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, संवाद साधला पाहिजे, या हेतूने आयईईई काम करत आहे. पीसीसीओई मध्ये आज होत असलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये संगणन, संप्रेषण, ऑटोमेशन तसेच यांत्रिक अभियांत्रिकी'चे विषय निवडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना भविष्यात याचा मोठा फायदा होईल, असे मत डॉ. अमर बुचडे यांनी व्यक्त केले.

या परिषदेसाठी देशासह सोळा देशांमधून बाराशे चाळीस प्रवेशिका आल्या. त्यामधून २१४ शोध निबंधांची निवड करून त्याचे सादरीकरण करण्यात येणार आहे, असे डॉ. जयश्री कट्टी यांनी सांगितले. 'आयमेस' साठी २६० प्रवेशिकां मधून १२० शोध निबंधांची निवड करण्यात आली, असे डॉ. नरेंद्र देवरे यांनी सांगितले.

डॉ. गोविंद कुलकर्णी म्हणाले, की संशोधकांच्या नवकल्पनांना प्रोत्साहन देऊन व्यासपीठ मिळवून देण्यासाठी; तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवरील संशोधकांशी ओळख होण्यासाठी ही परिषद उपयुक्त आहे.


यावेळी परिषदे विषयी माहिती असलेल्या स्मरणिकेचे प्रकाशन उपस्थितांच्या हस्ते करण्यात आले. या परिषदेसाठी विविध देशांतील प्रतिनिधी, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. अंजली श्रीवास्तव, डॉ. संदीप पाटील यांनी केले. आभार डॉ. स्वाती जगताप यांनी मानले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करून परिषदेसाठी शुभेच्छा दिल्या.

# मोहननगर परिसरात वारंवार वीज खंडित

### नागरिक संतप्त; भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज



**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या पूर्व उच्च प्राथमिक (इयत्ता पाचवी) शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा (इयत्ता आठवी) अंतिम निकाल आणि शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात आली आहे. शिष्यवृत्तीचा एकूण निकाल २२.०६ टक्के लागला आहे.**

मोहननगर परिसरात वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. याविरोधात नागरी हक्क कृती समितीच्या वतीने भोसरी विभागीय कार्यालय महावितरणला निवेदन दिले आहे. महावितरणचा गलथान आणि नियोजनशून्य कारभाराबाबत नाराजी व्यक्त करत वीज पुरवठा सुरळीत करण्याची मागणी करण्यात आली. मोहननगरमधील वीज प्रश्नाबाबत शिष्टमंडळाने भोसरीचे उपअभियंता एस. एस. क्षीरसागर यांना निवेदन दिले. त्यावेळी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर, संजय जगताप, माधव निर्लेकर, महेश पंडित आदी उपस्थित होते. कार्यकारी अभियंता अतुल देवकर यांच्याशीही चर्चा झाली.

मोहननगरमधील विद्युत रोहित्रावर भार अधिक असल्यामुळे उच्च दाब वाहिनीवर ताण येतो आणि त्यामुळे वारंवार समस्या येत आहेत. मोहननगर परिसरात वीजपुरवठा सतत खंडित होत आहे. विद्युत रोहित्राच्या जागेवर झाड, झुडपे आणि गवत वाढलेले आहे. या परिसराचा समावेश भोसरी विभागात नवीन जोडल्यामुळे कर्मचाऱ्यांची आणि शिडी गाडीची संख्या अपुरी आहे, ज्यामुळे कर्मचारी वेळेवर पोहोचू शकत नाहीत. लघुदाब वाहिनी (एलटी) व फीडर बॉक्स यांचा सर्व्हे करण्याची गरज आहे.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A
NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046